एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे वेतनाबाबत

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग,
शासन परिपत्रक क्र. मबाआ-२०१८/प्र.क्र. ७२/का-७अ
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: ८ मार्च, २०१९.

संदर्भ:- १) केंद्र शासनाचे दिनांक ८.१२.२०१७ रोजीचे पत्र
२) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग,क्र.एबाविं-२०१७/प्र.क्र.३४८/का.६, दिनांक ३०.६.२०१८
३) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग,क्र.मबाआ-२०१८/प्र.क्र.७२/का.७-अ, दिनांक १७.१२.२०१८

प्रस्तावना:-

एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना सन १९७५-७६ या वर्षापासून राबविण्यात येत आहे. केंद्र शासनाने दिनांक ८/१२/२०१७ च्या आदेशान्वये एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत वेतन याबाबीकरीता केंद्र व राज्य हिस्साचे प्रमाण २५:७५ असे केले आहे. यापूर्वी वेतन या बाबीकरिता केंद्र व राज्याच्या हिश्याचे प्रमाण अनुक्रमे ६०:४० असे होते. त्याकरिता सदर योजनेतील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन केंद्र हिश्यातील ६० टक्के प्रमाणे वेतन २२३६ १९०९ (०१-वेतन) व २२३६ १९७२ (३६-सहा.अनुदाने,वेतन) तर राज्य हिश्यातील ४० टक्केप्रमाणे वेतन २२३६ १९१८ (०१-वेतन) व २२३६ १९८१ (३६-सहा.अनुदाने,वेतन) या लेखाशीर्षामधून अदा करण्यात येते होते. तथापि, आता केंद्र शासनाने वेतन याबाबीकरीता केंद्र व राज्य हिस्साचे प्रमाण २५:७५ असे केले आहे. सदर प्रमाण बदलताना जिल्हा कार्यक्रम अधिकारी, सांख्यिकी सहायक, बाल विकास प्रकल्प अधिकारी, मुख्यसेविका/पर्यवेक्षिका इत्यादी पदांकरिता केंद्र शासनाने २५% प्रमाणे वेतनाकरिता त्याचा हिस्सा व ७५ % प्रमाणे राज्य हिस्सा असे प्रमाण केले आहे. तर उर्वरीत संवर्गातील पदांकरिता (आयुक्तालयातील सर्व पदे, कार्यालय अधिक्षक, कनिष्ठ लिपिक, वाहन चालक, शिपाई, प्रकल्पातील इतर पदे इत्यादी.) केंद्र सरकार वेतनाकरिता निधी देणार नसल्याने आता राज्य शासनास या पदांकरिता वेतन १००% राज्य हिस्स्यातून अदा करणे आवश्यक आहे.

२. सदर बाब दिनांक ५ जून,२०१८ रोजी झालेल्या मा.मंत्रीमंडळ बैठकीत विचारार्थ ठेवण्यात आली होती.त्यास मा.मंत्रीमंडळाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन अदा करण्याकरिता केंद्र शासनाने बदलेल्या प्रमाणानुसार खालीलप्रमाणे नवीन लेखाशीर्ष/उद्दिष्ट उघडण्यात आली आली असून त्याबाबतचे आदेश संदर्भाधीन क्रमांक-३ येथील दिनांक १७.१२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत:-

अ.क्र.	योजनेचे नाव	नवीन लेखाशीर्षाचा संगणक सांकेतांक	उद्दिष्ट
नवीन लेखाशीर्ष/उद्दिष्ट			
१	अंगणवाडी सेवा(सर्वसाधारण खर्च)(केंद्र हिस्सा २५ %)	२२३६ २१३७	०१-वेतन
२	अंगणवाडी सेवा(सर्वसाधारण खर्च)(राज्य हिस्सा ७५ %)	२२३६ २१४६	०१-वेतन
३	म.जि.प.व पं.स.अधिनियम १९६१ यांच्या कलम १२३ व २६१ अन्वये ए.बा.वि.से.योजनेंतर्गत अंगणवाडी सेवेसाठी जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदान(केंद्र हिस्सा २५ %)	२२३६ २१५५	३६-सहा.अनुदाने(वेतन)
४	म.जि.प.व पं.स.अधिनियम १९६१ यांच्या कलम १२३ व २६१ अन्वये ए.बा.वि.से.योजनेंतर्गत अंगणवाडी सेवेसाठी जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदान(राज्य हिस्सा ७५ %)	२२३६ २१६४	३६-सहा.अनुदाने(वेतन)
५	म.जि.प.व पं.स.अधिनियम १९६१ यांच्या कलम १२३ व २६१ अन्वये ए.बा.वि.से.योजनेंतर्गत अंगणवाडी सेवेसाठी जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदान(अतिरिक्त राज्य हिस्सा १०० %)	२२३६ २१७३	३६-सहा.अनुदाने(वेतन)
नवीन लेखाशीर्ष/उद्दिष्ट			
६	अंगणवाडी सेवा (अतिरिक्त राज्य हिस्सा १०० %)	२२३६ १९४५	०१-वेतन

३. सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता सदर शासन निर्णयान्वये वेतनाकरिता वरीलप्रमाणे नव्याने उघडण्यात आलेल्या लेखाशीर्ष/उद्दिष्ट यामध्ये तरतुद अर्थसंकल्पित करण्यात आली असून यापुर्वीच्या लेखशीर्षामध्ये तरतुद अर्थसंकल्पित करण्यात आलेली नाही. त्यानुसार सन २०१९-२० या आर्थिक वर्षापासून वरीलप्रमाणे नवीन लेखाशीर्ष/उद्दिष्ट यामधून वेतन आहरित करण्याकरिता सूचना देण्याची बाब विचाराधीन होती.

<u>शासन परिपत्रक</u>:-

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अधिकारी/कर्मचारी यांचे वेतनाकरिता संदर्भाधीन क्रमांक-३ येथील दिनांक १७.१२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये नव्याने उघडण्यात आलेल्या लेखाशीर्ष/उद्दिष्ट यामध्ये सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता तरतुद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. त्यानुसार सन २०१९-२० या आर्थिक वर्षापासून सदर योजनेतील अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन या नवीन लेखाशीर्ष/उद्दिष्ट यामधून आहरित करण्यात यावे. तसेच जुन्या लेखाशीर्षांतर्गत वेतनाकरिता निधी खर्च होणार नाही याची दक्षता आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांनी घ्यावी.

२. वरीलप्रमाणे वेतन आहरित करताना केंद्र शासनाने दिनांक ८.१२.२०१७ रोजीच्या आदेशान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचना विचारात घ्यावात. त्यानुसार ज्या पदांना केंद्र शासनाने केंद्र व राज्य हिश्याचे प्रमाण २५: ७५ केले आहे. अशा पदांवरील अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन संबधित केंद्र हिश्याच्या (लेखाशीर्ष २२३६ २१३७,०१-

वेतन /लेखाशीर्ष २२३६ २१५५, ३६-सहा.अनुदाने वेतन) या लेखाशीर्षामधून २५ टक्के प्रमाणे व राज्य हिश्याच्या (लेखाशीर्ष २२३६ २१४६,०१-वेतन /लेखाशीर्ष २२३६ २१६४, ३६-सहा.अनुदाने वेतन) लेखाशीर्षामधून ७५ टक्के प्रमाणे वेतन आहरित करण्यात यावे. तसेच ज्या पदांना १०० टक्के राज्य हिश्यामधून वेतन द्यावयाचे आहे त्या पदांना १०० टक्के अतिरिक्त राज्य हिश्याच्या (लेखाशीर्ष २२३६ १९४५, ०१-वेतन/लेखशीर्ष २२३६ २१७३, ३६-सहा.अनुदाने वेतन) या लेखाशीर्षामधून वेतन आहरित करण्यात यावे. याबाबतची दक्षता आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांनी घ्यावी.

३. वरील सुचनांचे सर्व संबधित अधिकाऱ्यांनी काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व संबधित अधिकारी/कर्मचारी यांना यासंदर्भात सविस्तर सूचना द्याव्यात.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक क्रमांक-२०१९०३०८१३२१०८९८३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, serialNumber=4ca059ab7b8d64aaf749fe58e0a714a015f521cb28fd2204e49a4d81f12a5745, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2019.03.15 12:17:39 +05'30'

(ला.रा.गुजर)
शासनाचे सह सचिव

प्रति,

१. आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई
२. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे
३. मा.मंत्री,महिला व बाल विकास विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
४. मा.राज्य मंत्री,महिला व बाल विकास विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
५. महालेखापाल,महाराष्ट्र राज्य १/२ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर
६. संचालक,लेखा व कोषागारे संचलनालय,मुंबई(आयुक्तालय,नवी मुंबई मार्फत)
७. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद(आयुक्तालय,नवी मुंबई मार्फत)
८. सर्व विभगीय उपआयुक्त, महिला व बाल विकास (आयुक्तालय,नवी मुंबई मार्फत)
९. सर्व महिला व बाल विकास अधिकारी, जिल्ह परिषद (आयुक्तालय,नवी मुंबई मार्फत)
१०. सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी/ग्रामीण(आयुक्तालय,नवी मुंबई मार्फत)
११. अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
१२. निवासी लेखा परिक्षा अधिकारी,मुंबई
१३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,(आयुक्तालय, नवी मुंबई मार्फत)
१४. वित्त विभाग (कार्यासन व्यय-६/अर्थसंकल्प-७), मंत्रालय,मुंबई
१५. नियोजन विभाग(कार्यासन १४७२), मंत्रालय,मुंबई
१६. महिला व बाल विकास विभाग(का-४),मंत्रालय,मुंबई
१७. निवड नस्ती, का-७अ